भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र.२३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०३/२०१७

**१) संगनमत करुन विवाहीतेस शारीरीक व मानसीक त्रास देवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०३/२०१७ चे १२.२५ वा. दरम्यान यातील फिर्यादी मारोती भाऊराव येवले वय ४३ वर्ष, रा. गोंडपेठ वर्धा रोड ता. भद्रावती जि. चंद्रपुर यांची भाची सौ. सारीका सुधीर बुराडे वय ३० रा. विरली खंदाळ हिचे वर आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करुन मृतकचे चारीत्र्यावर संशय घेवुन नेहमी मारपीट करुन शारीरीक व मानसीक त्रास देवुन मृतक हिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने मर्ग क्र. ०५/१७ कलम १७४ जाफौ. तपास व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे ४९८(अ),३०६,३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. नेवारे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे.

**२) अज्ञात चोराने टेकलेले दार उघडुन आत प्रवेश करुन पॅन्टच्या खिश्यातील पैश्याची चोरी . :–**

दिनांक २९/०३/२०१७ चे ०८.१० वा. ते ०९.३० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे राहते घराचे टेकलेले दार उघडुन आत प्रवेश करुन घरातील खुंटीला लटकवलेल्या पॅन्टच्या खिश्यात ठेवलेले २,०००/–रु. चे १० नोटा व १००/–रु. च्या १० नोटा असे एकुण २१,०००/–रु. काढुन चोरुन नेल्याने फिर्यादी संतोष लक्ष्मण गोंढळे वय ५१ वर्ष, रा. मुर्झा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहे.

**३) मागील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन धानाच्या पोत्याची चोरी . :–**

दिनांक २७/०३/२०१७ ते २८/०३/२०१७ चे रात्रीच्या दरम्यान यातील फिर्यादीचे खुर्शीपार येथील घराच्या दाराचे कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन मागील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेले १००८ जातीचे धानाचे १२० पोते त्यापैकी प्रत्येकी ७५ किलो प्रमाणे असलेले एकुण ३३ पोते धान किंमती ४०,०००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. गिताबाई अशोक बागडे वय ४९ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड अशेक नगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**४) लोखंडी सेंन्ट्रीगच्या प्लेटा चोरुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २९/०३/२०१७ ते ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी बिहारीलाल कल्यानदास जांगीया वय ५९ वर्ष, रा. साकोली यांनी त्याचे प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत उकारा नाला येथे भिंतीचे बांधकामासाठी वापरलेले भुषण वैद्य रा. कुसारी टोला यांचे मालकी हक्काचे सेंन्ट्रीग कामी लावलेले ३ २ फुट लांबी रुदीचे जुण्या लोखंडी ७० प्लेटा अंदाजे किंमती ३५,०००/–रु. चा माल यातील आरोपीने बैलबंडीवर टाकुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**५) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन मारहान केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २८/०३/२०१७ ते २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी दिपक प्रभाकर कुंभलवार वय ३१ वर्ष, रा. बेळा/मानेगाव यांचे वडील प्रभाकर पंढरी कुंभलवार वय ५५ वर्ष, रा. बेळा हे घराचे बाजुला लघुशंका करीत असता यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे वडीलास 'तु आमचे जागेत लघुशंका का करीत आहेस' असे बोलुन गालावर थापड मारले व आरोपी क्र. २ ने सुध्दा फिर्यादीच्या वडीलाचे गालावर मारले त्यामुळे ते खाली पडले व दोन्ही आरोपींनी संगनमत करुन लाथाने मारले त्यामुळे फिर्यादीचे वडीलास दोन्ही डोळयाच्या बाजुला मार लागुन रक्त निघाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :-

दिनांक २९/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडार, करडी, गोबरवाही, पालांदुर व पवनी येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४८ लिटर हातभट्टी दारु किंमती ४,४००/—रु. व २ लिटर ७०० मिली लिटर देशी दारु किंमती ७५०/—रु. तसेच जुगारातुन ४१०/—रु. चा माल असा एकुण ५,५६०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.